2 6 AUG 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांनी परिघातील इतिहास विद्यार्थ्यांसमोर आणावा

## ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे : विद्यापीठात क्रांतिअग्रणी जी. डी. लाड अध्यासनाचा प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी क्रांतिअग्रणी जी. डी.(बापू) लाड अध्यासन केंद्राच्या प्रारंभावेळी ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, पी. एस. पाटील, अरुण लाड, व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. २५ : 'महाराष्ट्रातील विद्यापीठांनी आपल्या आजूबाजूच्या परिघात घडलेला इतिहास अभ्यासाच्या रूपाने आपल्या विद्यार्थ्यांसमोर आणावा. इतिहासाचा अर्थ सम्यकपणे सांगण्याचे कार्य क्रांतिअग्रणी जी. डी. बापू या अध्यासन केंद्राचे असेल. बापूंसारख्या माणसांची आज खऱ्या अर्थाने गरज आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक क्रांतिअग्रणी जी. डी.(बापू) लाड यांच्या नावे अध्यासन सुरू करण्यात आले. यावेळी 'भारतीय स्वातंत्र्यलढा आणि जी. डी. बापू लाड' या विषयावर ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, तर आमदार अरुण लाड प्रमुख उपस्थित होते.

कांबळे म्हणाले, 'जी. डी. बापू हे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा याच्या पलीकडे जाऊन मातृभूमीसाठी झगडणारे थोर स्वातंत्र्यसेनानी होते. आपला देश, आपली माणसे आणि एक समाजवादी स्वप्न घेऊन ते जगत होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रगती करणारे माणसे निर्माण करावयाची आहेत हे त्यांनी ओळखले होते.'

आमदार लाड म्हणाले, 'बापूंनी केलेले कार्य, चळवळ समाजापर्यंत पोहोचली पाहिजे. त्यांच्या लढ्यातील वस्तुनिष्ठ इतिहास समाजापुढे आणावा, हा प्रमुख उद्देश अध्यासन केंद्राचा आहे. समाज हेच बापूंचे कुटुंब होते.'

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, 'बापूंच्या कार्याचे क्षितिज खूप विस्तीर्ण आहे. ते समजावून घेण्यासाठी निश्चितपणे संशोधन झाले पाहिजे.'

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सरोज पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी किरण लाड, व्यंकाप्पा भोसले, डॉ. अशोक चौसाळकर, माया पंडीत- नारकर, विश्वनाथ माळी, जी. पी. माळी, डी. व्ही. मुळे, शरद नावरे, टी. एस. पाटील, पी. पी. कुंभार, आर. बी. पाटील, दिनकर पाटील, आर. जी. कुलकर्णी उपस्थित होते. अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नवनाथ गुंड यांनी आभार मानले.

2 6 AUG 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड मातृभूमीसाठी झगडणारे स्वातंत्र्यसेनानी

## ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे; विद्यापीठात क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासन प्रारंभ

**शिवाजी विद्यापीठातून...**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड हे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांच्या पलीकडे जाऊन मातृभूमीसाठी झगडणारे थोर स्वातंत्र्यसेनानी होते. आपला देश, आपली माणसे व एक समाजवादी स्वप्न घेऊन ते जगत होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत उत्तम कांबळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील थोर स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड यांच्या नावे अध्यासन सुरू करण्यात आले. त्याच्या प्रारंभप्रसंगी भारतीय स्वातंत्र्य लढा आणि जी. डी. बापू लाड या विषयावर ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

आ. अरुण लाड म्हणाले, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांनी केलेले कार्य, चळवळ समाजापर्यंत पोहोचले पाहिजे. अध्यक्षीय मनोगतामध्ये बोलताना प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. (बापू) लाड यांच्या कार्याचे क्षितिज खूप विस्तीर्ण आहे. ते समजवून घेण्यासाठी निश्चितपणे संशोधन झाले पाहिजे. याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सरोज पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नवनाथ गुंड यांनी आभार मानले. यावेळी सरपंच किरण लाड, लाड कुटुंबीय, व्यंकप्पा भोसले, डॉ. अशोक चौसाळकर, माया पंडित नारकर, विश्वनाथ माळी, डॉ. जी. पी. माळी, माजी कुलसचिव डॉ. डी. व्ही. मुळे, शरद नावरे, प्राचार्य टी. एस. पाटील, पी. पी. कुंभार, आर. बी. पाटील, दीनकर पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 AUG 2025
पुढारी

# विद्यापीठात चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात चक्रधर स्वामी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. रणधीर शिंदे, सूक्ष्मजीवशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. पंकज पवार, डॉ. दीपा इंगवले, डॉ. नईम नदाफ, हर्षद कांबळे यांच्यासह प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

2 6 AUG 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल फाऊंड्री कार्यशाळा उत्साहात

- तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकीकडून आयोजन

प्रतिनिधी
वारणानगर

येथील तात्यासाहेब कोरे अभियांत्रिकी मधील मेकॅनिकल विभाग आणि एआयसीटीई (वाणी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'डिजिटल फाऊंड्री : आयओटी, रोबोटिक्स व ऑटोमेशन यांचे एकत्रीकरण" या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा उत्साहात झाली.

या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी वारणा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. विनय कोरे व मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. व्ही. व्ही. कारजिन्नी यांनी मार्गदर्शन केले. वारणा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनीही नावीन्यपूर्ण कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल सर्व संयोजकांचे आणि ही कार्यशाळा एआयसीटीईने प्रायोजित केली त्याबद्दल धन्यवाद दिले.



**वारणानगर : येथील कार्यशाळेत मयुरा ग्रुपचे कार्यकारी संचालक रवी डोल्ली यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. एस. एम. पिसे, डॉ. डी. एन. माने, डॉ. पी. व्ही. मुळीक, डॉ. एम. एस. धुत्तरगाव.**

तसेच विद्यार्थ्यांनी औद्योगिक वसाहती फिरण्यासाठी वेळ काढून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहनही केले. मयुरा ग्रुपचे कार्यकारी संचालक रवी डोल्ली यांनी कामगारांना बदलून त्याठिकाणी ऍटोमेशन वापरले जावे, अशा क्रांतीची अजून आपल्या येथे गरज नाही तर जेथे मानवी सुरक्षितता गरजेची आहे तेथे हे तंत्रज्ञान वापरले जावे, असे यावेळी बोलताना सांगितले.

या कार्यशाळेत मयुरा स्टील्स प्रा. लि., कोल्हापूरचे अध्यक्ष चंद्रशेखर डोल्ली, मौर्या इंडस्ट्रीज प्रा. लि., कोल्हापूरचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश पाटील, घाटगे पाटील इंडस्ट्रीज लि.,कोल्हापूरचे संचालक आदित्य पाटील, इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन फाउंड्रीमन, कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष राहुल पाटील, डॉ. एस. एस. मोहिते व डॉ. एस. एस. ओहोळ (सीओईपी, पुणे), मोईन सिद्दीकी (सीमेन्स डिजिटल इंडस्ट्रीज सॉफ्टवेअर, पुणे), प्रा. शैलेश शिरगुप्पीकर (आर. आय. टी., सांगली), सी. पी. महाजन (सीईओ, डॉल्फिन लॅब. पुणे) आदींचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमासाठी अधिष्ठाता डॉ. एस. एम. पिसे, प्राचार्य डॉ. डी. एन. माने, विभाग प्रमुख डॉ. पी. व्ही. मुळीक, कार्यशाळेचे समन्वयक डॉ. एम. एस. धुत्तरगाव, सहसमन्वयक डॉ. एस. व्ही. लिंगराजू आणि महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यातून दीडशेहून अधिक विद्यार्थी, उद्योजक आणि प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कृष्णकुमार जोशी यांनी केले, आभार कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. मुकुंद धुत्तरगाव यांनी मानले.